Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-4 | Issue-3 | Sept-2014 Available online at
www.aygrt.isrj.org

लोकसाहित्य संकलन-संशोधनातील अनुभव

बाळासाहेब गुंजाळ

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक.

सारांश - *लोकसाहित्याच्या संकलन-अभ्यासाची सुरुवात नेमकी कधी झाली? लोकसाहित्याच्या संकलनाची प्रेरणा कशी मिळाली? याविषयी नेमके सांगणे अवघड असले, तरी ही प्रेरणा मूळचीच असावी असे मला वाटते. मी एम.ए.ला असताना उत्सुकता म्हणून काही अहिराणी म्हणी व लोकगीते संकलित केली होती. पण दोन-चार वर्षे त्या वहीकडे मी फारसे गांभीर्याने पाहिले नाही.*

प्रस्तावना-

पीएच.डी. संशोधनाच्या निमित्ताने अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास करावा असे मला वाटत होते. विषय निवडीसंदर्भात माझी भावना माझे मार्गदर्शक डॉ. प्र. अ. राजगुरु यांचेकडे व्यनत केली. माझ्याकडे असलेले म्हणी व लोकगीतांचे संकलन त्यांना दाखविले. त्यांनीही या विषयाला दुजोरा दिला. पण विषय निश्चित करण्यापूर्वी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुखांना भेटून विषयासंबंधी चर्चा करावी असे सूचित केले. त्यानुसार मी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुखांना भेटलो. विभागप्रमुखांशी झालेल्या चर्चेत अहिराणी लोकसाहित्यावर पुणे विद्यापीठात संशोधन सुरू असल्याने दुसरा विषय निवडावा असे त्यांनी सूचित केले. त्यामुळे अहिराणी लोकसाहित्याचा अभ्यास पुन्हा लांबणीवर पडला. पुणे विद्यापीठात अहिराणी लोकसाहित्यावर सुरू असलेले संशोधन मात्र झाले नाही.

मार्गदर्शकांशी चर्चा करून 'कवी वसंत बापट यांच्या साहित्यनिर्मितीचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच्.डी. पदवीसाठी संशोधन केले. पीएच्.डी. पदवी प्राप्त झाल्यानंतर प्रबंधाचे पुनर्लेखन करून 'वसंत बापट : कवी आणि कविता', 'वसंत बापट : साहित्य आणि विचार', 'बापटांचे गद्यसाहित्य : आशय आणि आस्वाद', 'बापट उवाच' हे चार ग्रंथ बापटांच्या साहित्यावर प्रकाशित झाले. हे सर्व घडत असताना लोकसाहित्याचा अभ्यास अधिकच लांबणीवर पडत गेला.

लोकसाहित्याच्या संकलन-अभ्यासाला एक आकस्मिक घटना घडली. २६ जुलै १९९७ मध्ये माझी आई विहिरीत पडली. अपघात मोठा होता. मांडीचे हाड मोडल्याने दोन वेळा ऑपरेशन करावे लागले. पायाला पूर्ण प्लॅस्टर होते. आई सात-आठ महिने बेडवरच होती. पायाला प्लॅस्टर, दररोजचे ड्रेसिंग, वय झालेले आणि एकाच ठिकाणी पडून पडून ती कंटाळली होती. कधी कधी ती लहान मुलासारखी रडायची. मी आणि माझ्या पत्नीने आईला सहज विरंगुळा म्हणून जात्यावरच्या ओव्या म्हणण्याचा आग्रह केला. "तुझ्याकडे खूप अहिराणी ओव्या आहेत, त्या तुझ्याबरोबरच जातील. ओव्या टेप करून ठेवल्या तर तुझ्या आवाजातील ओव्या आमच्याकडे ठेवा म्हणून राहतील. तुझ्या शब्दात तुझी आठवण आमच्याकडे कायम राहील. तू आमच्याशी बोलतेस असे वाटत राहील." आईलाही बरे वाटले. आम्ही ओव्या दुपारच्या वेळेला टेप करायचो आणि म्हणी लिहून घ्यायचो. अश्नतपणामुळे आईला धाप लागायची. तिच्या छंदा-छंदानेच आम्ही ओव्या टेप करायचो. आठवून आठवून आई एक एक ओवी म्हणायची. यातून आईचा छान वेळ जायचा. आईला येत असलेली, आठवलेली सर्व ओवीगीते आम्ही संकलित केली. तिच्या वेदनेवर हे एक औषधच होते. ओव्या म्हणताना ती आजारपण विसरायची, वेदना विसरायची. ओव्या गाताना तिची करमणूक व्हायची, ती भूतकाळात जायची. आईकडून जवळपास ३०० ओव्या व १००-१५० म्हणी मी टेप केल्या. अपघातातून आई बरी झाली. १७ ऑ्नटोबर २००९ रोजी आईचे निधन झाले. पण आईचा आवाज आणि आईच्या मुखातील ओवीरूप शब्दधन आमच्याकडे आहे. लोकसाहित्याच्या संकलनाची-अभ्यासाची मूळ प्रेरणा इथे आहे, असे मला वाटते. कौटुंबिक व्यापामुळे व इतरही कारणांनी मला लोकसाहित्याच्या संकलन-संशोधनाकडे वळता आले नाही. लोकसाहित्याच्या संकलन-संशोधनाला उशीर झाला असला तरी आईमुळे प्रेरणा मिळाली हे माझ्यादृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे.

जानेवारी २००५ मध्ये नाशिकला ७८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न झाले. हे साहित्य संमेलन मराठा विद्या प्रसारक समाजाच्या विद्यमाने के.टी.एच.एम. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित केल्याने 'नाशिक आणि लोकसाहित्य' हा लेख लिहिण्याची आणि 'जनस्थान' या स्मरणिकेची काही जबाबदारी माझ्याकडे आली. या लेखाच्या निमित्ताने मी लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वळलो. यातूनच मला अहिराणी लोकगीतांच्या संशोधनाचा प्रोज्नेट करण्याची प्रेरणा मिळाली. सन २००६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीला "बागलाणी बोलीतील लोकगीते : सांस्कृतिक आणि वाङ्मयीन अभ्यास' या विषयावर दीर्घ संशोधन प्रकल्प सादर केला. १ जुलै २००६ ते ३० जून २००९ या कालावधीत हा संशोधन प्रकल्प पूर्ण केला. या संशोधन प्रकल्पाचा अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील बागलाण, मालेगाव, कळवण, देवळा या चार तालुनयातील गावागावात जाऊन स्त्री-पुरुषांकडून ६ ते ७ हजार लोकगीतांचे संकलन केले. वरील दीर्घ संशोधन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सन २०१२ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीला 'बागलाणी बोलीतील म्हणी : सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन अभ्यास' या विषयावर दुसरा दीर्घ संशोधन प्रकल्प सादर केला. १ जुलै २०१२ ते ३१ जून २०१४ कालावधीत हा संशोधन प्रकल्प पूर्ण करावयाचा आहे. या संशोधन प्रकल्पाच्या अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील बागलाण, मालेगाव, कळवण, देवळा या चार तालुनयात बोलल्या जाणाऱ्या अहिराणी भाषेतील २००० म्हणींचे संकलन केले आहे.

अहिराणी लोकगीतांचे व म्हणींचे संकलन करताना मला काही चांगले, काही वाईट, काही गंमतीशीर अनुभव आलेत. काही स्त्रिया कोणतेही आढेवेढे न घेता उत्स्फूर्तपणे जात्यावरील ओव्या गाऊन दाखवत. शेतीच्या कामाच्या वेळा टाळून आणि फोन करून जात असल्याने जवळपासच्या बायकांनाही गाणे म्हणण्यासाठी बोलावून घेत असत. आधीच फोन करून सांगितल्याने त्यांची मानसिक तयारी झालेली असायची. एकावेळी अधिक बायका जमलेल्या असल्याने वेगवेगळ्या आवाजातील ओवीगीते, विवाहगीते, गौराईगीते, देवदेवतांची गीते मिळत असत. स्त्रियांच्या ओवीगीतांत माहेरची नावे, नद्या-डोंगर-ग्रामदैवतांची नावे घेतली जातात. आपल्या गावात व माहेरी, परिसरात कोणाकोणाला चांगली गीते म्हणता येतात याची माहिती मिळत असे. त्यामुळे संकलनाच्या कामात अधिक गती येत गेली.

ग्रामीण स्त्रीया श्नयतो अनोळखी पुरुषांच्या समोर गाणे म्हणायला लाजतात. पण मी लोकगीते संकलनासाठी निवडलेले क्षेत्र हे माझ्या परिचयाचे असल्याने, प्रत्येक तालुनयांत नातेवाईक व मित्रपरिवार असल्याने आणि लोकगीते संकलनाच्या वेळी माझी पत्नी सोबत असल्याने मला स्त्रीयांकडून लोकगीते, ओव्या संकलनात कमी अडचणी आल्यात. अहिराणी ही आम्हा दोघांची मातृभाषा असल्याने

संकलनक्षेत्रात गेल्यावर आम्ही ग्रामीण स्त्रीयांशी अहिराणीत संवाद साधत असल्याने त्यांना जवळीक वाटायची, आपलेपणा वाटायचा. ग्रामीण स्त्रीयांच्या, विशेषत: म्हाताऱ्या स्त्रीयांच्या छंदाछंदाने घेतले तर लोकगीतांचा मोठा खजिना गवसतो, हा माझा अनुभव आहे.

लोकसाहित्य संकलनाचे काही अनोखे अनुभव सांगण्यासारखे आहेत. हे अनुभव माझ्या कायम स्मरणात आहेत, नव्हे ही माझ्या मर्मबंधातील अनोखी ठेव आहे. मालेगाव तालुनयातील टाकळी या गावी कानबाईची गाणी संकलनाचा अनुभव मोठा संस्मरणीय आहे. टाकळी येथील काही पुरुष मंडळी कानबाईचे भ्नत असून ते चांगली गीते सादर करीत असल्याची माहिती मिळाली. टाकळीला माझी मेहुणी सौ. सरोज सुकदेव पवार प्राथमिक शिक्षिका म्हणून नोकरीस होती. तिने श्री. चिंतामण नामदेव निकम व श्री. रामदास नामदेव निकम यांना कानबाईची गाणी संकलनास येत असल्याचा फोन केला. त्यांनी आम्हाला सायंकाळची ५ वाजेची वेळ दिली. आम्ही टाकळीला जाण्याआधीच कानबाईची गाणी म्हणणारे श्री. पंडित आनंदा निकम, कैलास खंडू सोनजे, नानाजी कारभारी सोनजे, शिवमन मोतीराम शेवाळे, भरत आनंदा निकम, चिंतामण नानाजी सोनजे, सुभाष चिंतामण बच्छाव, योगेश सुभाष बोरसे अशी १०-१५ माणसे आणि आजूबाजूच्या मळ्यातील इंदूबाई हिरामण निकम, प्रभाबाई चिंतामण निकम, मंगल रमेश निकम, शोभा पंडित निकम, विमल शिवमन निकम, कल्पना रामदास निकम, इंदूबाई तात्याभाऊ निकम, अशा १५-२० स्त्रीयांना बोलावून घेतले होते. श्री. चिंतामण नामदेव निकम यांनी जवळपास ५० माणसांचा पुरणपोळीचा (खापरावरील मांडे) स्वयंपाक केला. आमच्यासह सर्वांनी सहभोजन केले.

माझी पत्नी व मेहुणी घरात स्त्रीयांची गाणी, ओव्या टेप करून घेत होत्या. बाहेर ओसरीवर मी पुरुषांची कानबाईची गाणी टेप करून घेतली. कानबाईची गाणी सादर करण्यासाठी वाद्याची साथ असावी असा त्यांनी आग्रह धरला. मी १५०० रुपये देऊन वाद्याची साथ देणारा स्थानिक वाद्यवृंद बोलावला. वाद्याच्या साथीने कानबाईच्या गीताच्या सादरीकरणास अधिकच रंगत आली. रात्री दोन-तीन वाजेपर्यंत स्त्री-पुरुष उत्स्फूर्तपणे गाणी म्हणत होती. काही पुरुष मंडळी साडी परिधान करून त्या गीतांवर नाचले, स्त्रीयाही गीतांच्या तालावर मनसोनत नाचल्या. आपण एका वेगळ्या जगात असल्याचा अनोखा अनुभव आम्ही घेत होतो. एवढी माणसे जमतील, कार्यक्रम असा रंगत जाईल याचा आम्हाला अंदाज नव्हता. अचानक गेल्याने या चांगल्या उपक्रमाचे व्हिडिओ चित्रण करता आले नाही, याची खंत मनात कायम आहे. पण एक मात्र झाले, त्या घराशी, तेथील माणसांशी, त्या गावाशी आमचे प्रेमाचे, जिव्हाळ्याचे भावबंध निर्माण झाले; आणि हे भावबंध आजही टिकून आहेत याचा आनंद सर्वांना आहे. कानबाईच्या गीतांच्या संकलनाच्या निमित्ताने चांगली माणसे जोडली गेल्याचे समाधान फार मोठे आहे.

दुसरा अनुभवही असाच गंमतीशीर आणि भावशील आहे. देवळा तालुनयातील कापशीच्या शेवंताबाई शिवमन भदाणे या आजी नाशिकला मुलाकडे असायच्या. त्यांच्याकडे अहिराणी ओव्या असल्याची माहिती मिळाल्याने मी संपर्क केला.

त्या नात्यातीलच होत्या. त्यांना आमच्या घरी घेऊन आलो. त्या बोलताना अहिराणी ओव्या, म्हणी सहज म्हणायच्या. त्यांचे पाठांतर व आवाज चांगला होता. पत्नीने त्यांना जात्यावरच्या ओव्या म्हणायला सांगितल्यावर त्या आनंदीत झाल्या. उत्साहाने त्यांनी काही ओव्या म्हटल्या, त्या पत्नीने टेप करून घेतल्या. पण पुढे गंमतच झाली. टेप समोर ठेवला की आजी येत असलेल्या ओव्या विसरायच्या. त्यांना एकदम टेन्शन आल्यासारखे व्हायचे. पत्नीने "आजी तुम्ही एक एक ओवी म्हणा, तुम्हाला दम लागला की बोटाने खूण करा, मी टेप बंद करीन" असे सांगितले. आजी एक एक ओवी म्हणायची, पत्नी टेप करून घ्यायची. "पाठ चोळी देऽवं बहिण, कळ लगी वनी" असे सांगून पत्नीकडून पाठ चोळून घ्यायच्या. आजी कधी झोपून तर कधी बसून ओव्या म्हणायच्या. हॉलमध्ये जाऊन सोफ्यावर बसायच्या, मध्येच "माले पाणी देऽवं बहिण, माले भूक लगी गयी, खावाले दे" असे म्हणून पाणी प्यायच्या, थोडंसं खायच्या, पुन्हा ओव्या म्हणायच्या. पत्नीने आजींच्या वयाचा विचार करून, तिच्या मनासारखे वागून आजीजवळचा ओव्यांचा खजिना हळूहळू मोकळा केला. दुपारी १२ वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत आजींकडून ओव्या संकलित केल्या. सायंकाळी आजी त्यांच्या घरी गेल्यावर आम्ही उभयता खूप हसलो. पुढे काही दिवसांनी आजी वारल्या. त्यांच्याकडचे ओवीगीतांचे अक्षरधन आमच्याकडे होते. त्यांच्या आवाजातील ओवीगीतांची सीडी नातेवाईकांनी करून घेतली. अशा कितीतरी आजींकडे ओवीगीतांचे मौलिक अक्षरधन आहे.

आमचे लहान साडू श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे यांच्या आई पार्वताबाई मुरलीधर भामरे यांच्याकडून लोकगीतांचा मोठा खजिना मिळाला. साडू शेजारीच राहात असल्याने त्या नाशिकला आल्या की लोकगीते टेप करून घ्यायला सांगतात. त्या म्हणतात, "मी मरी जासू, तेव्हढंच मन्हं नावघेणं मागे राही जायी. माले गाणा येतस, गाणा कसाले पोटात ठेवानं, मी गवू ते गाणाऽभी संगे येतीन. मना आवाज कायमना तुमना कानात बसी राही. तेव्हढीच तुमले मनी आठवण राही." त्यांचा आवाजही खणखणीत असल्याने ठसकेबाज चालीत त्या ओव्या म्हणतात. त्यांचेकडून ५-६ कॅसेट लोकगीते संकलित केली आणि फोफीरला गेल्यावर त्यांच्या वयाच्या स्त्रीयांकडून पुष्कळ लोकगीते मिळाली.

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापिका चित्रा गायकवाड यांनी त्यांच्या मोठ्या बहिणीला खूप गाणी येतात, त्यांच्याकडे अहिराणी ओव्यांचा मोठा साठा आहे, असे सांगितले. मालेगाव तालुनयातील पिंपळगाव (दाभाडी) येथील रहिवासी असलेल्या विमल माणिकराव पवार या आजी नाशिकला मुलीकडे आल्या होत्या. त्यांचे जावई श्री. सीताराम गुंजाळ व माझे आडनाव गुंजाळ असल्याने आणखी जवळीक निर्माण झाली. आजीच्या मुलीने सकाळी वडे घातले होते आणि दुपारी त्यांची विश्रांतीची वेळ होती. पण आजींनी ओवीगीते म्हणण्याला आनंदाने होकार दिला. अतिशय सुंदर आवाजात, अर्थपूर्ण ओवीगीतांचा अनमोल साठा आमच्या स्वाधीन केला. पिंपळगावला येण्याचे आमंत्रणही त्यांनी दिले.

मालेगाव तालुनयातील सौंदाणे येथील गंगाबाई पवार या आजीचे वय १०४ वर्षांचे होते. त्यांच्याकडे चांगल्या अर्थपूर्ण ओव्या असल्याचे मला समजले. माझा विद्यार्थी राहुल केवळ देवरे याच्या मदतीने आजींकडून ओव्या संकलित केल्या. या वयातही आपण काही देवू शकतो याचे आजींना समाधान वाटले. "या ओव्या माझ्याबरोबर येतील, त्या तुम्हाला दिल्या तर माझे शब्द मागे राहतील, तेव्हढीच माझी आठवण" असे त्या म्हणाल्या. वय झाल्याने आठवून आठवून ओवीगीते म्हणायला काही दिवस लागले. आम्ही सतत संपर्कात राहून त्यांच्याकडून ओव्या मिळविल्या. त्यांच्याकडून जात्यांवरच्या ओव्यांचा चांगला खजिना मिळाला. थोड्याच दिवसात आजी गेल्या. आजींच्या आवाजातील ओवीगीतांची कॅसेट असावी असे मुलांना वाटल्याने त्यांना कॅसेट तयार करून दिली. आजींच्या दशक्रियाविधीच्या दिवशी ती कॅसेट जमलेल्या लोकांनी ऐकली. आजी ओवीगीतांच्या रूपाने स्मरणात आहेत.

एकदा आम्ही देवळा तालुनयातील मकरंदवाडी येथे नातेवाईकांकडे मुनकामाला गेलो. तिथे त्यांची मटाणे येथील बनूबाई सोनू आहेर ही वयोवृद्ध बहिण श्री. अहिला निंबा नवले या भावाला व श्री. साहेबराव धनजी नवले या भाच्याला भेटायला आलेली होती. माहेर व माहेरची माणसे स्त्रीला अखेरपर्यंत किती प्रिय असतात, याविषयीची सहजच एक ओवी त्यांनी म्हटली. हया आजींकडून बऱ्यापैकी ओवीगीते मिळतील असे मला वाटले. मी पत्नीच्या माध्यमातून त्यांना ओवीगीते म्हणण्याचा आग्रह केला. रात्री दोन वाजेपर्यंत जागून आजींनी अतिशय उत्साहाने ओव्या म्हटल्या. एकसलगपणे, कुठेही न अडखळता, खणखणीत आवाजात म्हटलेली ओवीगीते मी टेप करून घेतली. माहेरचे अतिशय सुंदर व भावस्पर्शी चित्रण जणू काही आमच्या डोळ्यासमोर तरळून जात होते. त्यांच्या ओव्यांमधून माहेरचे प्रेम, माहेरच्या माणसांची ओढ, भावनिक जिव्हाळा यात चिंब भिजलो. आजींचा मनमोकळेपणा व आनंदी स्वभावाचा आम्ही अनुभव घेतला. त्यानंतर थोड्याच दिवसात त्या आजी वारल्या, पण आमच्या कायमच्या स्मरणात राहिल्यात.

देवळा तालुनयातील भऊर येथील अनुभव कटू आहे. भऊरच्या एका नातेवाईक आजींकडे जात्यावरच्या ओव्या, विवाहगीते, गौराईगीते, देवदेवतांची गीते, म्हणी यांचे चांगले भांडार आहे. अहिराणी लोकसाहित्याचे हे भांडार आपल्याला मिळेल या आशेने त्यांचेकडे गेलो. पण आजी आमच्याशी फारशा मनमोकळेपणाने बोलल्या नाहीत. थोडंफार बोलल्या तेही खूप आढेवेढे घेऊन. माझ्या पत्नीला व आजीच्या घरातील माणसांना याचे वाईट वाटले. निघताना कळले की, आजीच्या भावाचे निधन झाले आहे. आजीच्या भावाचे वय तसे बरेच होते. पण आजी भावाच्या दु:खातून सावरल्या नव्हत्या. आम्हाला याची पूर्वकल्पना नव्हती. आम्ही आजीचे वागणे समजून घेतले व रिकाम्या हाताने परतलो.

देवळ्याजवळ सरस्वतीवाडी हे माझे सासरवाडीचे गाव. तिथे गेल्यावर काही स्त्रीयांकडून ओवीगीते, उखाणे, म्हणी मिळाल्या. वालूबाई विश्वास शेवाळे या स्त्रीचे वडील एक वर्षापूर्वी गेले होते. तिचा स्वभावही विनोदी आहे. वडिलांच्या प्रेमाला पारख्या झालेल्या त्या स्त्रीने वडिलांच्या नावाने एक शोकगीत रडून दाखविले.

'आप्पानीऽका भजननी येळ जयीऽवं माय
आप्पाऽका पंढरपूरना वारकरीऽवं माय
आप्पाऽका झोपाळ्या वडऽवं माय
हायी सावली कथी हरपी गयीऽवं माय'

हे शोकगीते टेप केल्यावर इतर स्त्रीया गंमतीने खूप हसल्या. अहिराणी भाषेतील शोकगीत हे गायल्यासारखेच वाटते. जवळच्या व्यनतीचे निधन झाल्यावर गहिवरून गहिवरून गेलेल्या व्यनतीचे वर्णन अलंकारिक भाषेत व्यनत होते. त्यामुळे अहिराणी भाषेतील शोकगीतेही श्रवणीय वाटतात. शोकगीतात मोठी भावुकता दडलेली असते.

लग्नसमारंभात म्हटली जाणारी गीते संकलित करण्याचा अनुभवही गंमतीशीर आहे. आम्ही विवाहगीते लग्नघरी जाऊन मिळविली. लग्नघरातील उत्साह काही वेगळाच असतो, तो उत्साह अनेकदा अडचणीचा ठरतो. लग्नाची गाणी त्या त्या विधीच्या वेळी म्हटली जातात. लग्नसमारंभ कमीतकमी दोन दिवसांचा असतो. इतका वेळ लग्नघरी थांबणे शनय होत नाही. लग्नाची गीते म्हटली जातात, तेव्हा आम्ही गीते टेप करायचो. काहीवेळा एकाऐवजी चार-पाच स्त्रीया एकत्र गाणे म्हणतात. प्रत्येक स्त्रीचे उच्चार, शब्दरचना, लय घेण्याची पद्धत, आवाज, यात खूपच तफावत असते. पुन्हा लग्नघरी अनेकांच्या बोलण्याचा आवाज, वाजंत्रीचा आवाज, लहान मुलांच्या रडण्याचा आवाज, बायकांचा हसण्या-खिदळण्याचा आवाज, असे अनेक आवाजांचे मिश्रण आणि विवाहगीत एकत्र टेप होते. त्यामुळे काही शब्द कळायचे, तर काही कळायचे नाहीत. काही स्त्रीया अर्धे गाणे म्हटल्यावर, लगेच दुसरे गाणे सुरू करायच्या. नंतर पुन्हा त्यांचेकडून आठवून पूर्ण गाणे टेप करून घ्यावे लागत असे.

खानदेशातील लग्नात वरमाईची प्रथा हा आगळा-वेगळा विधी आहे. विहिणींच्या चेष्टा-मस्करी, शृंगारभाव, अश्लीलता, टोमणादर्शक शब्दप्रयोग यांचा गंमतीशीर समन्वय असतो. वरमाईची गीते स्त्रीयांसमोरच म्हटली जातात. ही गीते पुरुषांसमोर म्हणताना स्त्रीया लाजतात. त्यामुळे मी पत्नीच्या माध्यमातून ही गीते संकलित केली.

म्हणींचेही काही चांगले अनुभव माझ्या गाठीशी आहेत. १ जानेवारी २००९ ते ३१ डिसेंबर २००९ या कालावधीत माझे दैनिक 'गावकरी' या वृत्तपत्रात 'म्हणी : अनुभवाच्या खाणी' हे सदरलेख सुरू होते. सदरलेखनाला एक निमित्त झाले. माझा विद्यार्थी स्वानंद श्रीपाद बेदरकर हा दैनिक गावकरीत सहसंपादक म्हणून कार्यरत आहे. त्याने एके दिवशी मला विचारले, सर जानेवारी २००९ पासून गावकरीत नवीन सदर सुरू करीत आहोत. आपल्याकडे अहिराणी लोकगीते व म्हणींचे चांगले संकलन आहे. आपण गावकरीत वर्षभर अहिराणी म्हणींचे सदर लिहिणार का? मी अगदी सहजपणे होकार दिला. दररोज एक म्हण याप्रमाणे वर्षभर 'म्हणी : अनुभवाच्या खाणी' हे अहिराणी म्हणींचे सदर लिहायचे ठरले. मी अगदी उत्साहाने म्हटले, 'एक एक महिन्याच्या म्हणी मी पाठविन!' परंतु प्रत्यक्ष म्हण आणि तिचे सामाजिक उपयोजन, तिच्या मागील अनुभवाचे थोड्नयात विश्लेषण लिहिणे किती अवघड आहे, याचा अंदाज आला. आपण या चक्रात पुरते अडकलो असेही वाटले. माझ्या पत्नीने या कामात मला चांगली साथ दिली. अगदी दोन-दोन, तीन-तीन म्हणी लिहून मी गावकरीत पाठवू लागलो. सदरलेखन पूर्ण झाले, पण मला खूपच चांगले अनुभव मिळाले. अनेकांचे प्रतिक्रिया व्यनत करणारे फोन आले, पत्रे आली. गावकरी परिवाराशी जोडला गेलो, अनेकांशी सुसंवाद झाला, परिचय झाला, ओळखीचे वर्तुळ चांगलेच रुंदावले. सदरलेखनाचे 'अहिराणी म्हणी : अनुभवाच्या खाणी' हे ग्रंथरुप साकार झाल्याचे समाधान मिळाले.

वृत्तपत्रीय सदरलेखन काळातील काही मोजके अनुभव सांगण्यासारखे आहेत. देवळ्याला आमच्या एका नातेवाईकाने काही अर्थपूर्ण म्हणी दरवाजाला चिकटविल्या आहेत, येता-जाता त्या वाचाव्यात असा उद्देश आहे. त्यांनी अनेक म्हणी फाईलमध्ये संग्रहित केल्या आहेत. मालेगावला एका बिल्डरने 'पै पै जोडू, येळवर मोडू' या म्हणीच्या १५०-२०० प्रती झेरॉ्नस करून मोसम पुलावर काही लोकांना आणि त्यांच्याकडे कामावर असलेल्या मजुरांना वाटल्या. नाशिकरोडच्या एका डॉ्नटर महिलेने गावकरीतील 'लोकनं पाहवा आणि आपलं इसरवा' ही म्हण वाचल्याने त्या आत्महत्या करण्यापासून वाचल्या. म्हण वाचल्याने 'मला जगण्याचे बळ मिळाले' हे त्यांनी फोन करून सांगितले.

तिळवणला माझा लहान भाऊ रामदास भादू गुंजाळ यांची डाळिंब रोपांची नर्सरी आहे. डाळिंबाची रोपे घेण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील आणि जिल्ह्याबाहेरील अनेक शेतकरी येत असतात. त्यांच्या तोंडी सहजपणे म्हणी येतात. त्या म्हणी तो आठवणीने वहीत लिहून ठेवतो. लग्नसमारंभ व इतर सामाजिक कार्यक्रमात वावरताना ऐकलेल्या म्हणी स्मरणात ठेवतो. ऐकलेल्या म्हणी वहीत लिहून ठेवण्याचा त्याला छंदच जडला आहे. त्याच्याकडून मला २०० ते २५० म्हणी मिळाल्यात. रामदासला म्हणींची उपयुनतता कळली, त्याच्या ज्ञानात भर पडली. काही म्हणींचे उपयोजन, म्हण वापरामागील सामाजिक संकेत, माणसांचे स्वभावचित्रण, आचार-विचार तो मला विस्तृतपणे सांगतो.

माझी मेहुणी सरोज सुकदेव पवार ही प्राथमिक शिक्षिका आहे. ती मालेगाव येथे राहते. तिचा जनसंपर्क चांगला असल्याने अहिराणी म्हणींच्या संकलनासाठी मला तिची चांगली मदत होत असते. नोकरीच्या निमित्ताने रोजचे जाणे-येणे, प्राथमिक शिक्षकांचे गटसंमेलन, ग्रामीण जीवनाशी घनिष्ठ परिचय, लग्नविधी, अंत्यविधी, दारावर जाणे व परिसरातील स्त्री-पुरुषांच्या गप्पांमधून नेमकेपणाने लक्ष देऊन म्हणी स्मरणात ठेवते व नंतर लिहून घेते. तिचे समाजाचे निरीक्षणही चांगले आहे. म्हणी संकलनाचे काम ती मोठ्या हौशेने व आवडीने करते.

लोकजीवनात अनेक जातिवाचक व व्यवसायदर्शक म्हणी आहेत. दैनिक गावकरीत सदर चालू असताना एका समाजाच्या वकीलाचे जातिवाचक म्हणींवरून 'तुम्हाला कोर्टात का खेचू नये', असे धमकावणारे फोन येत असत. जातिवाचक म्हणी हया समाजाकडूनच संकलित होतात, तो समाजाचा दस्तावेज आहे; आपली संस्कृती, समाजरचना, जातिरचना व अन्य संदर्भ त्यातून कळतात, एवढाच अभ्यासाचा माझा हेतू आहे, असे सांगितल्यावर धमकावणारे फोन बंद झालेत, पण मन:स्ताप मात्र झाला.

लोकसाहित्यात जात, व्यवसाय, धर्म, रुढी-परंपरा, लोकमानस, लोकसंकेत, लोकभ्रम, लोकसंस्कृती, इतिहास, भूगोल, निसर्ग, कृषीजीवन/ कृषीसंस्कृती, मानवी स्वभाव, मानवी वृत्ती-प्रवृत्ती यांचे संदर्भ असतात. लोकसाहित्यातून तत्कालीन समाजजीवनाचे सर्वांगाने दर्शन घडते. लोकसाहित्याच्या अभ्यासातून जातीच्या, धर्माच्या भावना दुखावण्याचा हेतू नसतो. पण अलीकडे याविषयीच्या भावना अधिक टोकदार झाल्याने नाहक त्रास होतो, रोषाला बळी पडावे लागते. त्यामुळे लोकसाहित्याचा सर्वांगीण अभ्यास करता येत नाही.

लोकगीते, म्हणी संकलित करताना काही ठिकाणी आमिष द्यावी लागली. मुलांना खाऊ, कपडे, साडी असे त्याचे स्वरूप होते. काही ठिकाणी विडया, दारुसाठी पैशाची मागणी व्हायची. विधिगीते मिळविण्यासाठी वाजंत्री लावली. दोन पैसे खर्च केल्याशिवाय लोकगीते, लोकम्हणी मिळत नाहीत, असाही काही ठिकाणी अनुभव आला.

काहींना खूप प्रस्तावना करावी लागली. लोकगीते, म्हणी संकलनाचे व अभ्यासाचे महत्त्व सांगावे लागले. पुढील पिढीसाठी हे साहित्य उपयुनत आहे. तुम्ही गेल्यावर हे साहित्य पुढील पिढीला उपयोगी पडेल, तुमचं नाव पुस्तकात छापून येईल, तुमचा आवाज कायम राहील, असे सांगावे लागले. मग खूप आढेवेढे घेत लोकगीते, म्हणी मिळत असत. काही स्त्री-पुरुषांकडून प्रयत्न करूनही लोकगीते, म्हणी मिळाल्या नाहीत. लोकसाहित्याचा भरपूर साठा असूनही मानवी स्वभाव कसे आडवे येतात याचाही अनुभव आला. काहींनी कोणतीही अपेक्षा न ठेवता, अगदी सहजपणे, मोठ्या मनाने व आनंदाने लोकगीते, म्हणी दिल्यात.

सुटीचा दिवस आणि कॉलेजचे कामकाज संपल्यानंतर शनिवार व रविवारची भटकंती ठरलेली असायची. आम्ही सतत जवळ टेपरेकॉर्डर, रिकाम्या कॅसेट, सेल, नोंदवही इत्यादी साहित्य ठेवायचो. अभ्यासक्षेत्रातील एखाद्या गावी नातेवाईक अगर ओळखीचा धागा

पकडून ते गाव गाठायचे आणि ओवीगीतांचे, म्हणींचे संकलन करणे हा माझा छंद झाला. एक प्रकारचे वेड म्हणू या किंवा झपाटलेपण म्हणू या. पण मला आता वाटते की, माणसाला कुठले तरी चांगले वेड, झपाटलेपण असावे, असे वाटते. एखादी चांगली म्हण मिळाली, नवी ओवी मिळाली की कोण आनंद होणार! कधी कधी मला प्रवासातही गीते मिळालीत, म्हणी मिळाल्यात. लोकगीते, म्हणी संकलनाचे माझे खास नेटवर्किंग आहे. या नेटवर्किंगचा मला संकलनासाठी चांगला उपयोग झाला आहे. बागलाण, कळवण, मालेगाव, देवळा या तालुनयात असलेला नातेसंबंध, मित्रपरिवार, विद्यार्थी व ओळखीचा मला चांगला उपयोग करून घेता आला. लोकसाहित्य संकलनासाठी या तालुनयातील बहुतांश गावांचा धांडोळा घेतला. लोकगीते, म्हणी उपलब्ध होऊ शकतील अशा स्त्री-पुरुषांपर्यंत पोहचलो. पुढील पिढ्यांसाठी एक महत्त्वाचे सांस्कृतिक संचित जमा करता आले, मौलिक वाङ्मयधन संकलित केले याचे मला समाधान वाटते.

अंत्यविधी व दशक्रिया विधीच्या ठिकाणीही मला म्हणी मिळाल्या आहेत. लोकसमूह म्हटला की गप्पा आल्याच. गप्पांच्या ओघात विषयानुरूप सहजपणे म्हणी मिळतात. जनमाणसात शिरल्याने मला लोकगीते, म्हणी मिळत गेल्या.

हया कामात खूप माणसे भेटली, खूप माणसे जोडली गेली, अनेक माणसे वाचायला मिळाली, विचारांचे आदान-प्रदान झाले, निरीक्षणातून लोकांच्या वृत्ती-प्रवृत्तीचा अभ्यास होत गेला, लोकसाहित्याचा अभ्यास ही आनंदपर्वणी आहे असे मला वाटले. ही संधी माझ या आयुष्यात आली, हा मी भाग्ययोग समजतो. हा आनंद अवर्णनीय आहे, पण मी समाधानी नाही. लोकसाहित्याचा फार मोठा ठेवा ग्रामीण भागातील स्त्री-पुरुषांकडे आहे, त्याचे संकलन होणे आवश्यक आहे.

लोकसाहित्य संकलनाला व संशोधनाला मला अधिक वेळ देता आला नाही, याची मला खंत वाटते.